आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ जानेवारी २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी मतदान शांततेत सुरु/ मुंबईत दुपारी दीड वाजेपर्यंत सुमारे ३० टक्के मतदान

- विविध ठिकाणी शाई पुसली जात असल्याचा तसंच मतदान केंद्रांवर गोंधळ असल्याचा विरोधकांचा आरोप

- समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- २०२५-२६ मधे भारताचा जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा जागतिक बँकेचा अंदाज

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांमधे आज सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. काही मतदान केंद्रांवरच्या किरकोळ तक्रारी वगळता मतदान शांततेत सुरु आहे. राजधानी मुंबईत मतदानाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणा सतर्क आहेत. मुंबईत एकूण १० हजार २३१ मतदान केंद्र असून केंद्रांसभोवतालच्या परिसरात सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्यात आली आहे. या निवडणुकीत एकूण सतराशे उमेदवारांचं भवितव्य १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदार ठरवतील. यापैकी ४८ लाख २६ हजार ५०९ महिला तर १ हजार ९९ इतर मतदार आहेत. काही ठिकाणी मतदार यादींचा गोंधळ दिसून येत आहे मतदार यादी मध्ये नावं शोधण्यासाठी मतदारांची धावपळ होत आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच गरोदर महिलांसाठी प्रत्येक केंद्रावर विशेष व्यवस्था आहे.

मुंबईतले केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, खासदार रविंद्र वायकर, आमदार संजय उपाध्याय, तसंच उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, राज ठाकरे या नेत्यांनी मतदानाचा हक्क बजावला.

अभिनेता अक्षय कुमार, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर इत्यादी प्रसिद्ध व्यक्तिमत्वांनी मतदान केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर महानगरपालिकेसाठी आज सकाळी मतदान केलं. सर्वांनी मतदानाचा हक्क आणि कर्तव्यही बजावावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात मतदान केलं.

**<><><><><>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेत **दुपारी दीड** वाजेपर्यंत सुमारे ३० टक्के मतदान झालं

नवी मुंबईत ३३ पूर्णांक २६ शतांश

नाशिक महानगरपालिकेत  २६ पूर्णांक ५२ शतांश

नागपूर २६ पूर्णांक ५० शतांश

पिंपरी चिंचवड २८ पूर्णांक १५ शतांश

पनवेल ३१ टक्के

परभणीत साडे तीस टक्के

जालन्यात ३२ पूर्णांक ७२ शतांश टक्के, तर

अकोल्यात ३० पूर्णांक ४५ शतांश टक्के मतदान झालं.

धुळे महानगरपालिकेत  २४ पूर्णांक २३ शतांश

इचलकरंजीत ३१ पूर्णांक २९ शतांश

छत्रपती संभाजीनगर ३० पूर्णांक १९ शतांश टक्के

मालेगाव ३३ टक्के

अमरावतीमधे २८ टक्के मतदान झालं.

सोलापूरमधे 30 टक्के,

चंद्रपूरमध्ये २६ टक्के

अहिल्यानगर महानगरपालिकेत ३२ टक्के,

अकोल्यात साडे ३० टक्के

भिवंडी निजामपूर २६ टक्के

उल्हासनगर २३ टक्के मतदान झालं.

ठाणे महानगरपालिकेत **सकाळी साडे अकरा** वाजेपर्यंत १९ टक्के मतदान झालं

वसई विरार १९ पूर्णांक ३४ शतांश टक्के,

नांदेड वाघाळा महानगरपालिकेत १७ पूर्णांक १४ शतांश टक्के,

लातूरला १८ पूर्णांक २२ शतांश,

सांगलीमधे १७ पूर्णांक २० शतांश मतदान झालं.

इचलकरंजीत १८ पूर्णांक ५७ शतांश,

जळगावमधे १३ पूर्णांक ३९ शतांश,

आणि कोल्हापूर महानगरपालिकेत २३ टक्के मतदान झालं.

**<><><><><>**

राज्यात महापालिका मतदानानंतर मतदारांच्या बोटाला लावलेली शाई पुसण्याचे प्रकार उघडकीला येत आहेत. याबद्दल विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी सर्व मतांची नोंद झाल्यावर ‘बीप’ आवाज येत नसल्याचा दावा खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. अनेक मतदारांना मतदान केंद्रही सापडत नाही. काही ठिकाणी मतदान केंद्राबाहेर पैसे वाटप सुरू असल्याचा आरोप त्यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात केला आहे. यामुळं सर्व प्रक्रिया संशयात सापडली असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

पुण्यात काही मतदान केंद्रावर चौथ्या उमेदवाराला मत दिल्यावर मतदान यंत्रावरचा लाइट लागत नसल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अंकुश काकडे यांनी केला आहे. पुण्यात नेहरूनगर, चिंचवडगाव येथील मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशिन तांत्रिक कारणामुळे बंद पडल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

राज्यातल्या महापालिका निवडणुकांच्या दरम्यान सुरू असलेल्या गोंधळ प्रकरणी सर्व निवडणूक यंत्रणेवर कारवाई करण्याची मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते

- - **होल्ड - उद्धव ठाकरे बाइट - -**

धुळ्यात प्रभाग क्रमांक १८ मध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मतदान यंत्राची तोडफोड केली असा आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सतीश महाले यांनी केला. मिरच्यामारुती

प्राथमिक विद्यामंदिरातल्या मतदान केंद्रात ही घटना घडली. इथले मतदान काही वेळानंतर पुन्हा सुरू झाले. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून अतिरिक्त बंदोबस्त तैनात असून प्रशासनाकडून घटनेची चौकशी सुरू आहे.

**<><><><><>**

मतदारांनी एकदा मतदान केल्यानंतर त्याची नोंद घेतलेली असते. त्यामुळे फक्त शाई पुसून पुन्हा मतदान करता येणार नाही, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. शाई पुसायचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणं हे चुकीचं आहे, मतदानानंतर बोटावर लावलेली शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदानाला आल्याचं आढळून आलं, तर त्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असंही आयोगानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

लोकशाही संस्था आणि लोकशाही प्रक्रियांमुळे लोकशाही राज्यपद्धतीला स्थैर्य आणि वेग मिळतो, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं राष्ट्रकुल संघटनेतल्या देशांचे पीठासीन अधिकारी आणि अध्यक्षांच्या परिषदेला ते संबोधित करत होते. या परिषदेचं महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले,

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

भारतानं आपल्या विविधतेतून आपली लोकशाही बळकट केली, असं प्रधानमंत्री म्हणाले. समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ आहे आणि कोणताही भेदभाव न करता सामाजिक हित साधण्यासाठी सरकार काम करत आहे, असं त्यांनी सांगितलं.

राष्ट्रकुल संघटनेतल्या ४२ सदस्य देशांचे ६१ अध्यक्ष आणि पीठासीन अधिकारी या परिषदेत भाग घेत आहेत.

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज जागतिक बँकेनं वर्तवला आहे. स्थानिक मागणी वाढल्यानं ही वाढ होण्याची शक्यता आहे. तर पुढच्या आर्थिक वर्षात आर्थिक वृद्धी दर कमी होऊन साडेसहा टक्क्यांवर येईल, असा अंदाज या अहवालात व्यक्त केला आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ जानेवारी २०२६ - गुरूवार

**<><><><><>**

देशातून निर्यात होणाऱ्या मालाची उलाढाल गेल्या डिसेंबरमधे ३८ अब्ज ५० कोटी अमेरिकन डॉलर्सवर पोहोचली आहे. या महिन्यात आयातीत वाढ होऊन ती ६३ अब्ज ५५ कोटी अमेरिकन डॉलर्सवर पोहोचली. केंद्रीय वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी नवी दिल्ली इथं ही माहिती दिली. देशाची व्यापारी तूट डिसेंबरमधे २५ अब्ज अमेरिकन डॉलर्स झाल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या वर्षात एकूण वस्तू आणि सेवा निर्यात साडेआठशे अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

देशभरात आज ७८वा सेना दिवस साजरा होत आहे. सेना दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सेनादलातले जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनही सेना दिवसानिमित्त भारतीय सैन्यदलाला शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात होणाऱ्या विशेष ॲट होम स्वागत कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातल्या काही जणांना निमंत्रित करण्यात आलं आहे. नैसर्गिक शेती, जलसंवर्धन आणि ग्रामीण विकास क्षेत्रातल्या विशेष कामगिरीबद्दल नेरळचे चंद्रशेखर भडसावळे, नाशिकच्या योगविद्या धामचे योगगुरू विश्वास मंडलीक आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल मुंबईच्या रामनारायण ठाकुर महाविद्यालयाची विद्यार्थिनी इरम शेख यांना या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**